श्री राम चंद्र मिशन®
केवळ खाजगी वितरणाकरिता
ECHOES INDIA
जुलै २०१३ खंड ६ अंक ४

गुरूदेवांसंबंधी अहवाल

मे २०१३

पूज्य बाबूजी महाराजांच्या जन्मोत्सवानंतर लगेचच गुरुदेव पूर्णपणे दमून गेले होते. त्यांना थकवा येत होता आणि त्यामुळे ते बराच काळ विश्रांती घेत होते. आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी स्वत:ला महोत्सव संपेपर्यंत कार्यरत ठेवल्याचे दिसून येत होते पण नंतर मात्र त्यांनी ते सोडून दिले होते. होणाऱ्या उपचारांचा व औषधांचा त्यांच्यावर परिणाम झाला होता व त्यामुळे ते खूप थकलेले व पेंगुळलेले दिसत होते. पण काही दिवस असेही होते की ते अतिशय उल्हसित असत. हे सर्व काही अनिश्चित होते कारण एक दिवस ते ठीक असत तर दुसऱ्या दिवशी ते पूर्णपणे थकलेले असत. गुरुदेवांना असे त्रास सहन करतांना मूकपणे पाहणे फारच दु:खदायक होते पण आपण त्यांच्यासाठी फक्त प्रार्थना करु शकतो.

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी गुरुदेवांचे उत्सर्जनोपचार (रेडिएशन) संपले. त्यांच्या वेदना जरी कमी झाल्या असल्या तरी त्यांचे औषधोपचार व वेदनाशामक औषधे मात्र सुरुच होती. गुरुदेवांना चालणे टाळण्यास सांगितल्यामुळे ते त्यांच्या चाकांच्या खुर्चीतून फिरत असतात. गरजेपुरती काही पावले चालण्यासाठी त्यांना वॉकर वापरण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. यामुळे गुरुदेवांची हालचाल जरी मंदावली असली तरी त्यांनी या नवीन पध्दतीशी जुळवून घेतले आहे आणि ते हसतमुखाने त्यांच्या या चाकांच्या खुर्चीतून सगळीकडे फिरत असतात. क्वचित कधी तरी जेव्हा ते सत्संगाच्या संचालनासाठी ध्यानगृहात येतात तेव्हा व्यासपीठावरील आपल्या चाकांच्या खुर्चीत बसलेले गुरुदेव उत्साही व आनंदी असल्याचे दिसते. रविवार, दि. १२ मे २०१३ रोजी गुरुदेव ध्यानकक्षात आले व त्यांनी एक तासाहून अधिक वेळ सत्संगाचे संचालन केले.

बऱ्याचदा संध्याकाळी गुरुदेव बाहेर येऊन कुटिरासमोर साधारण तासभर बसत असत. यामुळे अनेक अभ्यासींना गुरुदेवांना भेटायला मिळत असे. जरी गुरुदेवांशी प्रत्यक्ष बोलणे शक्य नसले तरी त्यांच्या सान्निध्यात शांतपणे बसून रहाण्याची संधी मिळत होती. कधीतरी गुरुदेव बोलत असत पण बहुतेक वेळा ते शांत असत. कुटिराबाहेर मोठमोठाली झाडे आहेत ज्यावर अनेक पक्षांची घरटी आहेत. गुरुदेव जेव्हा बाहेर येऊन बसतात तेव्हा ते आनंदाने किलबिलाट करतात.

मे महिन्याच्या मध्यावर, गुरुदेवांचे आणखी काही वैद्यकीय उपचार सुरू होते. यामध्ये तपासणी व औषधोपचार यांचा समावेश होता. गुरुदेव जेव्हा एखादे औषध घेतात, त्याचा त्यांच्यावर परिणाम होतो व ते पूर्णपणे गळून गेल्यासारखे दिसतात.

दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जेव्हा त्यांना काही काम करायचे असते, तेव्हा त्यांना कितीही त्रास होत असला तरी तो दिसून येत नाही. ते त्या कामात मग्न असतात व ते पूर्ण करतात. काम पूर्ण झाल्यावर त्या वेदना परत दृष्यमान होतात. यावेळी जेव्हा त्यांच्यावर हे उपचार होत होते, तेव्हा पुढील दहा किंवा त्याहून अधिक दिवस त्यांना विलक्षण थकवा जाणवत होता. दिवसातील बहुतेक वेळ ते विश्रांती घेत असत. महिनाअखेरच्या सुमारास गुरुदेवांच्या वेदना अजूनही थांबल्या नव्हत्या म्हणून गुरुदेवांना MRI करण्यासाठी नेण्याचे ठरले. त्या चाचणीचे निष्कर्ष चांगले आल्यामुळे गुरुदेव व त्याचबरोबर डॉक्टरांनीसुध्दा सुटकेचा निश्वास सोडला.

गुरुदेवांसाठी एक नवीन इलेक्ट्रॉनिक चाकांची खुर्ची आणण्यात आली आहे. एका बटणाद्वारे तिची उंची कमी/जास्त करता येते. गुरुदेवांना ती चालविताना लहान मुलांसारखी गंमत वाटते.

महिनाअखेरीस गुरुदेवांना बरे वाटू लागले आणि प्रकृती सुधारल्याबरोबर त्यांनी त्यांच्या पहिल्या व सर्वात महत्वाच्या कामास म्हणजे प्रशिक्षकांच्या सिटींगला सुरुवात केली. बहुतेक दिवशी ते भल्या पहाटे एखाद्या प्रशिक्षकाला सिटींग देत असत आणि न्याहरीनंतर दुसरे सिटींग एखाद्या अभ्यासीला किंवा एखाद्या गटाला देत असत.

एके दिवशी संध्याकाळी कुटीराच्या अंगणात बंधू गुरप्रित सिंग यांच्या भजनांचा कार्यक्रम झाला. गुरुदेव त्यांच्या कार्यालयात बसले होते व अभ्यासी अंगणात होते. काही भजनांनंतर गुरुदेव थकल्यामुळे विश्रांती घेण्यास गेले पण जाण्यापूर्वी बंधू गुरप्रित यांना कार्यक्रम सुरू ठेवण्यास सांगून गेले.

मंगळवार, दि. २८ मे रोजी बंधू पी. आर. कृष्णा यांचा छपन्नावा जन्मदिवस होता. गुरुदेवांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले, त्यांना आशीर्वाद दिला व दालनातील सर्वांना प्रसादाचे वाटप केले. त्यादिवशी संध्याकाळी पाऊस पडला आणि चेन्नईमधील वातावरणात बराच गारवा आला. हे उन्हाळ्याचे दिवस संपत आल्याचे निदर्शक होते.

गुरुदेवांच्या नवीन दिनचर्येचा आणखी एक भाग म्हणजे, पहाटे कुटीराच्या बाहेर येऊन बसणे. ते पहाटे ५ वाजता उठतात, ५.३० पर्यंत बाहेर येतात नंतर सकाळी ६.१५ पर्यंत आत जातात. तोपर्यंत प्रशिक्षक उमेदवार आलेला असतो व गुरुदेव प्रशिक्षक सिटींग सुरू करतात. वातावरणात सुखद गारवा असल्यामुळे असे बऱ्याचदा होते. एकूण, गुरुदेवांची प्रकृती सुधारत आहे, ते हिंडू फिरू लागले आहेत व हळूहळू त्यांची नेहमीची दिनचर्या सुरू होत आहे.

जून २०१३

जसजशी गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत होती, तसतशी त्यांनी सर्व प्रशिक्षक उमेदवारांना स्वतःच सिटिंग्ज द्यायला सुरुवात केली. दि. १ जून रोजी गुरुदेवांना एका अभ्यासीने अमेरिकेत बनविलेल्या पहिल्या वहिल्या रेल्वेगाडीची प्रतिकृती भेट म्हणून दिली. तिच्या बनविण्यातील अचूकतेमुळे गुरुदेव प्रभावित झाले आणि त्यांचा आनंद त्यांच्यासमवेत असलेल्या सगळ्याजणांमध्ये पसरला. गुरुदेवांनी ती अतिशय काळजीपूर्वक हाताळली आणि आकाराने थोडी मोठी असली तरी तिला आपल्या दर्शनीकपाटामध्ये जागा करुन दिली.

एल.एम.ओ.आय.एस. विद्यार्थ्यांसाठी परिसंवाद

ओमेगा शाळेच्या माजी विद्यार्थ्यांसाठी लागोपाठ दोन परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये प्रथम तर दुसऱ्या आठवड्यामध्ये द्वितीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाच्या समन्वयकांनी येऊन गुरुदेवांची भेट घेतली व आपल्या परिसंवादासंबंधीच्या अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने गुरुदेवांशी छोटेखानी चर्चा केली.

संध्याकाळी गुरुदेव वॉकरच्या सहाय्याने कुटीराच्या प्रवेशद्वारापर्यंत जात असत आणि बाहेर जाऊन चाकांच्या खुर्चीत बसत असत. त्यामुळे त्यांना थोडा व्यायाम, ताजी हवा आणि अभ्यासींना भेटण्याची संधी मिळत असे, ज्यासाठी ते आतूर असत.

रविवार, दि. २ जून रोजी गुरुदेवांनी ध्यानकक्षात सुमारे एका तासाच्या सत्संगाचे संचालन केले. सत्संग संपल्यावर ते कुटीरामध्ये परत आले. आदल्या दिवशी संध्याकाळी तसेच सकाळी देखील अनेक अभ्यासींची त्यांनी भेट घेतल्यामुळे कुटीरामध्ये विशेष गर्दी नव्हती. अभ्यासींच्या हृदयातली तृप्ती जाणवत होती. असे वाटत होते की जणू काही गुरुदेवांनी सर्व अभ्यासींची हृदये व्यापून टाकली आहेत व त्यामुळेच प्रत्येकजण आनंदी व समाधानी आहे. गुरुदेव म्हणाले "आनंद समाधान देत नसतो पण समाधानामुळे आनंद मिळतो". बऱ्याच आठवड्यांनंतर बाहेर पडता आले आणि सत्संग संचालित करता आला म्हणून गुरुदेव आनंदी दिसत होते.

कार्यालयात अभ्यासींच्या एका गटासोबत गुरुदेवांचा वेळ अतिशय उत्तम गेला, ज्याची सुरुवात हसत खेळत झाली आणि नंतर त्यांनी त्याचे एका चर्चेत रुपांतर केले :

- आयकर विभागातील भ्रष्टाचाराबद्दल बोलतांना – आजचे जीवन हे फक्त हाव आणि अप्रामाणिकपणास उत्तेजन देते.
- ज्याला तुम्ही घाबरता, त्यालाच भीती तुमच्यापर्यंत आणते. ती तुमची भीतीच दुसऱ्यामध्ये परावर्तित होते.
- गुरुदेवांचे कुटुंब हे एकमेव असे कुटुंब आहे ज्यामध्ये चारही पिढ्या अभ्यासी आहेत.

सोमवार, दि. ३ जून, हा ओमेगाच्या माजी विद्यार्थ्यांच्या पहिल्या परिसंवादाचा प्रथम दिवस होता. गुरुदेव सकाळी ९ वाजता बाहेर आले आणि त्यांनी सुमारे तासभर सत्संगाचे संचालन केले. नंतर त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी भारतात भ्रष्टाचार किती प्रमाणात आहे आणि फक्त स्वतःच्याच नाही तर देशाच्यासुद्धा भवितव्याला आकार देण्याची जबाबदारी घेणे हे पुढील पिढीला का आवश्यक आहे हे नमूद केले. गुरुदेव म्हणाले, यातील एकाही विद्यार्थ्याने समाजाच्या दबावाखाली बदलू नये तर जो स्वतः बदलत नाही असा 'उत्प्रेरक' बनून त्यांनी समाजात बदल घडवून आणावा. गुरुदेव म्हणाले, ओमेगाच्या विद्यार्थ्यांकडून मला फक्त जास्त मार्क मिळवण्याची अपेक्षा नाही तर ते उत्तम आणि गुणसंपन्न असे मानव बनावेत, जे आकांक्षेला जास्त महत्व देतात, महत्वाकांक्षेला नाही. पैसा हा आनंद किंवा समाधान देऊ शकत नाही पण समाधान मात्र आनंद देऊ शकते ही वस्तुस्थिती त्यांनी पुन्हा एकदा संगितली. त्यानंतर गुरुदेवांनी काही



अभ्यासींना भाषणे करण्यास सांगितले. सर्व माजी विद्यार्थ्यांना दररोज सकाळी ९ वाजेपर्यंत कुटीरामध्ये सत्संगासाठी येण्यास सांगण्यात आले.

कार्यकारी समितीची सभा

बुधवार, दि. ५ जून रोजी गुरुदेव सत्संगासाठी जाण्यास तयार होते कारण त्यादिवशी सुमारे सात विवाह संपन्न होणार होते पण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी कुटीरामध्येच विश्रांती घेण्याचे ठरविले कारण सत्संगानंतर त्यांना कार्यकारी समितीच्या सभेला हजर रहावयाचे होते. त्यांच्याऐवजी बंधू कमलेश ध्यानकक्षात गेले. कार्यसमितीचे सदस्य कुटीरामध्ये गोळा झाले आणि गुरुदेव सभेसाठी शेवटपर्यंत उपस्थित राहिले जे अलिकडे कित्येक दिवसात झाले नव्हते. सहसा गुरुदेव सभेच्या शेवटी सभेत सामील होत असत. सभेच्या आराखड्याचे सर्वसाधारण निरीक्षण केल्यानंतर मिशनमध्ये चांगल्या गोष्टी घडत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला– जसे सिंगापूर आणि कतार येथील ध्यानकक्ष, आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या पदवीसाठीच्या (Baccalaureate) पुरस्कारासाठी एल.एम.ओ.आय.एस. ला मिळालेली मान्यता आणि मिशनमधील अभ्यासी व प्रशिक्षकांसाठीच्या प्रशिक्षण कार्यक्रमांमधील सुधारणा.

गुरुदेवांनी भारतातील आश्रमांच्या संख्येतील वाढ नमूद केली पण सहजमार्गास वाहून घेतलेली कमीत कमी दोन कुटुंबे तेथे जाऊन राहण्यास आणि प्रत्येक आश्रमाची काळजी घेण्यास तयार नाहीत ही वस्तुस्थिती आहे याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. ते म्हणाले, त्यांच्याकडे निवृत झालेल्या अभ्यासी आणि प्रशिक्षकांची एक यादी आहे पण ज्याठिकाणी त्यांची गरज आहे त्याठिकाणी ते जाण्यास व राहण्यास तयार नाहीत.

सभेच्या शेवटी ते त्यांच्या खुर्चीतून अतिशय सावकाश उठले आणि वॉकरच्या मदतीने हळूहळू कार्यालयाच्या दिशेने परत निघाले. जाताजाता ते म्हणाले, "ते जेव्हा वेदना देतात, तेव्हा ते शक्ती सुद्धा देतात" ते खरे तर दमलेले होते परंतु विश्रांतीसाठी जाण्यापूर्वी त्यादिवशी विवाह झालेल्या सर्व अभ्यासींना ते भेटले. त्यांनी सर्वांस आशीर्वाद दिले, त्यांच्याशी बोलले आणि त्यांच्याबरोबर फोटोही काढले.

एल.एम.ओ.आय.एस. विद्यार्थ्यांशी संवाद

ओमेगाच्या माजी विद्यार्थ्यांबरोबर गुरुदेवांनी बराच वेळ व्यतीत केला. एकदा तर चर्चासत्रातील सत्तर मुलांचा गट गुरुदेवांच्या कार्यालयात त्यांना पूर्णपणे वेढून होता. गुरुदेवांना खूप प्रश्न विचारले गेले आणि त्या सर्वांना त्यांनी तितक्याच नव्हे त्याहीपेक्षा जास्त उत्साहाने उत्तरे दिली.

एका अभ्यासी भगिनीने सकाळी लवकर उठणे आणि ध्यान करणे खूप कठीण आहे असे म्हटले. गुरुदेव म्हणाले, "हे पहा मी रोज रात्री पक्षांचे चिवचिवणे माझ्या शयनगृहातून ऐकतो. एखादा पक्षी कधीतरी पहाटे दोन अडीचच्या सुमारास झोपेतच चिवचिवताना मला ऐकू येतो. साधारण ३.३० च्या सुमारास, जवळजवळ अर्धा डझन पक्षी गाण्यास सुरुवात करतात आणि ५ वाजेपर्यंत ते सारे उठून गात एकमेकांना बोलावतात. तर याची सवय करा आणि 'एवढ्या सकाळी मी उठून काय करू', असे म्हणू नका. तुम्हाला माहित आहे, मी माझे दिवसभराचे काम संपल्याशिवाय झोपत नाही. मी उद्यासाठी काही काम शिल्लकच ठेवत नाही. काहीही नाही! मग ते ईमेल्स असोत वा पत्रे असोत वा सिटिंग्ज. लोक म्हणतात, "तुम्ही दमला आहात, तुम्ही विश्रांती घेतली पाहिजे" आणि मी म्हणतो, 'विश्रांती नको, माझे काम पूर्ण झाल्यानंतरच मग विश्रांती.' नाही नाही, मी खूप दमलो आहे....नाही, तुम्ही एवढे दमलेले नाही. ही फक्त एक वाईट सवय आहे. बेशिस्तपणा ही एक वाईट सवय आहे. शिस्तप्रियता ही एक चांगली सवय आहे."

विवाहाबाबत गुरुदेव म्हणाले, "तुमच्या डोळ्यांना ठरवू देऊ नका. तुमच्या हृदयाला ठरवू द्या. आणि तुमच्या पालकांच्या सक्तीनुसार वागू नका. त्यांना सांगा की हे माझे आयुष्य आहे. तुम्ही स्वत:चे आयुष्य जगलात. कोणाशी विवाह करायचा हे मी तुम्हाला सांगितले नाही आणि म्हणून तुम्हीही मला सांगू नका. मी त्या व्यक्तीशी आणि तेव्हाच विवाह करेन जेव्हा माझे हृदय होकार देईल. जातीचा किंवा पैशाचा किंवा इतर कशाचाही विचार करू नका आणि अमिताभ बच्चनसुद्धा नाही, ठीक आहे?"

एका मुलीने राजकारणाचा अभ्यास करण्याची इच्छा प्रदर्शित केली. यावर गुरुदेव म्हणाले, "राजकारण हा एक गलिच्छ विषय आहे. भ्रष्टाचार व इतर दुर्गुणांनी हा भरलेला आहे. मला कायदाही आवडत नाही आणि राजकारणही आवडत नाही, कारण दोन्हींमध्ये खोटे बोलावे लागते. 'सत्यम वद" शक्य नाही, 'धर्मम चर' सुद्धा शक्य नाही. मोठमोठे वकील, न्यायाधीश यांच्याबरोबर

झालेल्या माझ्या बैठकींमध्ये मी म्हणालो, की तुम्ही खोटे बोलता. यावर ते म्हणाले की आम्ही फक्त फिर्यादीचे अनुसरण करतो. असे पहा, न्यायाधीशास योग्य न्याय देता यावा म्हणून वकील नेमलेले असतात, पण ते केवळ त्यांच्या अशीलाला खटला जिंकण्यास मदत करतात." यावर त्या मुलीने ठासून सांगितले की ती पहिली प्रामाणिक राजकारणी व्यक्ती बनेल. त्यावर गुरुदेव म्हणाले, "जर तू पहिली प्रामाणिक राजकारणी व्यक्ती असशील तर लवकरच तुला उमगेल की परिस्थितीशी जुळवून घेणे शक्य नाही. आजूबाजूची परिस्थिती अशी आहे की लोकांची सहनशीलता कमी आहे. तू बाहेर फेकली जाशील." ते पुढे म्हणाले, " हे पहा असे काहीतरी कर ज्याची तुला मदत होईल आणि तुझ्या देशालाही. अद्भुतरम्य गोष्टींच्या मागे लागू नकोस. मलाही राजकारणात बदल घडवून आणायचा आहे. एकदा मी माझ्या गुरुदेवांना, बाबूजींना भ्रष्टाचाराविषयी विचारले. त्यावर ते म्हणाले की केवळ ईश्वर यात बदल घडवून आणू शकतो. भ्रष्टाचार हा इतका खोलवर रुजलेला व सर्वदूर पसरलेला आहे की एका व्यक्तीला त्याविरोधात काही करणे अशक्य आहे. म्हणून आपण प्रार्थना करूया. राजकारणात बदल घडवून आणण्यासाठी राजकारणात प्रवेश करणे आवश्यक नाही. तेव्हा असे पहा, प्रत्येक व्यक्ती जेव्हा स्वेच्छापूर्वक, आदरपूर्वक कायद्याचे पालन करेल तेव्हाच काहीतरी शक्य आहे. जेव्हा तुम्ही सत्य सांगाल तेव्हा कोणीही तुमचे कौतुक करणार नाही. पण सत्यवचनी व प्रामाणिक असल्याचे समाधान तुम्हाला निश्चितच लाभेल. जसे माझे गुरुदेव म्हणत असत, प्रामाणिक असणे हे प्रामाणिक असल्याचे पारितोषिक आहे. कारण लोक तुम्हाला विचारतील, 'प्रामाणिक असल्याने तुम्हाला काय मिळाले?' ईमानदार असल्यामुळे मला काहीतरी मिळाले पाहिजे असे नाही. आपण जे केले पाहिजे ते आपण करतोच, आणि तेच त्याचे बक्षीस आहे."

एका मुलाने विचारले, "गुरुदेव, मला वडिलांच्या व्यवसायात सहभागी व्हायचे आहे." यावर गुरुदेव म्हणाले, "होय, पण लक्षात ठेव, प्रामाणिक व्यवसाय नेहमीच परतावा देतो. जसे, ईमानदार गुंतवणूक ८%, ९%, १०% परतावा देते. अप्रामाणिक गुंतवणूक ४०% देते. पण यामध्ये धोका आहे, नाही का? तुमचे पैसे बुडू शकतात, तुमचे नाव खराब होऊ शकते, तुम्हाला तुरुंगातही जावे लागू शकते. तेव्हा, प्रामाणिकपणामुळे लाभांश असा मिळत नाही, पण आपली गुंतवणूक सुरक्षित असल्यामुळे समाधानी आयुष्य जाते."

दुसऱ्या एका मुलाने विचारले, "गुरुदेव, मला काय करावे हे समजत नाही" यावर गुरुदेव म्हणाले, "काळजी करू नकोस, दरवाजा उघडला जाईल. असे पहा, जर तू एकाच रस्त्यावरून चालत असशील तर तुला चिंता करण्याचे कारण नाही. पण जर रस्त्याला फाटा फुटलेला असेल किंवा तीन रस्ते असतील तर तुला कुठल्या रस्त्याने जावे याबद्दल संभ्रम वाटेल. पर्याय निवडायचा असल्याने ही समस्या निर्माण झाली आहे. जेव्हा निवडण्याकरीता पर्याय उपलब्ध असतात, उदा. तीन रस्ते, पाच रस्ते, पंधरा रस्ते इ., तुम्ही अस्वस्थ होता, तुमचा रक्तदाब वाढतो कारण कोणत्या रस्त्याने जावे हे तुम्हाला समजत नाही. हे तुमच्या हृदयाला ठाऊक असते, परंतु हृदय आणि मन यांची विरुद्ध दिशांना चालू असणारी रस्सीखेच ही समस्या कायम असते. तेव्हा, मनाला गप्प बसण्यास सांगावे व हृदयाचे अनुसरण करावे. यामुळे तुम्ही कधीही चुकणार नाही."

जूनच्या मध्यापर्यंत दोन्हीही चर्चासत्रांची सांगता झाली होती व गुरुदेवांच्या कुटीराची स्थिती व त्याचा नित्यक्रम पूर्वपदावर येत होता. जसजशी गुरुदेवांच्या आरोग्यात सुधारणा होत आहे तसतशी त्यांच्या वेळेची अभ्यासींकरीता असलेली उपलब्धता वृद्धिंगत होत आहे.

सहज संदेश क्र. २०१३.२६ गुरुवार, ६ जून २०१३

पू. गुरुदेवांच्या प्रकृतीविषयी वृत्त

प्रिय बंधू आणि भगिनींनो

गुरुदेवांच्या प्रकृतीविषयी आपणांस कळवून एक महिन्यापेक्षा जास्त काळ उलटला आहे. गुरुदेव त्यांच्यावर होणाऱ्या उपचारांना सकारात्मक प्रतिसाद देत आहेत व त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणादेखिल दिसून येत आहे. त्यांची हाडे आता मजबूत झाली आहे व त्यांचे चलनवलनसुध्दा वाढले आहे. संपूर्ण रोगमुक्ती होण्यासाठी अजून कदाचित दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो.

डॉ. नटवर शर्मा.

ओमेगा माजी विद्यार्थी चर्चासत्र

जूनच्या पहिल्या आठवड्यात संपन्न झालेल्या लालाजी मेमोरीयल ओमेगा इंटरनॅशनल शाळेच्या माजी विद्यार्थी संमेलनामध्ये सुमारे पंचाहत्तर विद्यार्थी सहभागी झाले होते. संमेलनाची परवानगी मिळाल्यापासून सर्व युवा अभ्यासी गुरुदेवांना भेटायला आतूर होते. शेवटी भेट झाल्यावर त्यांची हृदये आनंदाने शिगोशीग भरली. पहिल्या दिवशी गुरुदेवांनी विद्यार्थ्यांना सिटींग दिले व त्यानंतर त्यांच्याशी आपल्या भाषणातून संवाद साधला. 'समाधानी वृत्ती' व 'प्रामाणिक असण्याची आवश्यकता' यावर गुरुदेवांनी भर दिला. जसे स्वतःवर काहीही परिणाम न घडू देता उत्प्रेरक (catalyst) बदल घडवून आणतो, तशी आपली 'उत्प्रेरकाची' भूमिका कार्यक्षमतापूर्वक निभावून गुरुदेवांच्या स्वप्नातील भविष्यकाळातील भारतामध्ये पथ दर्शक होण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दुसऱ्या दिवशीची सुरुवात गुरुदेवांच्या कुटीरात सकाळी नऊ वाजताच्या सत्संगाने झाली. त्यानंतर बंधू कमलेश पटेल यांनी भाषण दिले. ते प्रामुख्याने निवड, (हृदयावरील) ठसे व समाधान या तीन विषयांबद्दल बोलले.

पुढील तीन दिवस समन्वयक व विद्यार्थ्यांचा गट यादरम्यान विचारांची सखोल अशी देवाण–घेवाण होत होती. दैनंदिन साधना, मनोवृत्ती, परस्परांशी जुळवून घेताना येणारे प्रश्न तसेच रोजच्या जीवनात येणाऱ्या अडचणी ह्या विषयांवर विचार व्यक्त करण्यात आले. आपल्या समस्यांबद्दल चर्चा करण्यासाठी, एकमेकांना स्वानुभवाचा आधार देण्यासाठी व समन्वयकांकडून सल्ला घ–ेण्यासाठी हा एक खुला मंच होता. पाचव्या दिवशी 'या परिसंवादाने मला काय दिले?' यावर सहभागींनी सर्व गटासमोर सादरीकरणे केली.

सर्व विद्यार्थी ओमेगा शाळेत आपल्या शिक्षकांना व कर्मचारी वर्गाला भेटण्यासाठी गेले. तेथे त्यांनी संपूर्ण दिवस व्यतीत केला. बंधू पी आर. कृष्णा व बंधू पुनित लालभाई यांनीही या मुलांशी संवाद साधला.

चर्चासत्राचा समारोप विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने झाला. यामध्ये काही गाणी आणि गरबा नृत्य सादर करण्यात आले.

औपचारीकपणे चर्चासत्राची सांगता करताना बंधू कमलेश यांनी "प्राणहुतीमुळे काय निर्माण होते?" असा प्रश्न उपस्थित केला. सहभागींना ह्या प्रश्नाचे उत्तर विचार करुन पुढल्या वर्षी द्यायचे आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमानंतर सर्व माजी विद्यार्थी गुरुदेवांना भेटले व त्यांच्या बरोबर ग्रुप फोटो काढला. फोटो काढत असताना गुरुदेव म्हणाले, "ही संघटना हा ओमेगा शाळेचा आत्मा आहे. तुम्ही या फोटोला 'ओमेगाचा आत्मा' असे नाव द्या."

खांद्यांवर जबाबदारी आणि हृदयात प्रेम, धैर्य व अभिलाषा घेऊन सहभागी परतण्यासाठी सज्ज झाले ते अधिक तयारीनिशी पुढील वर्षी भेटण्याचे आश्वासन देऊनच.

ओमेगा एक आशा–समन्वयकाच्या दृष्टीकोनातून

बंधू विक्टर कन्नन

सतत वाढत चाललेला भ्रष्टाचार व त्याप्रति संवेदनहिनता असणाऱ्या आजच्या काळामध्ये ओमेगा शाळा व तिचे माजी विद्यार्थी भविष्यकाळासाठी एक आशेचे स्थान आहे. ओमेगाचे विद्यार्थी आता सुरक्षित वातावरणातून मुक्त होऊन आपल्या उच्च शिक्षणाच्या बळावर बाजारू जगाची आव्हाने पेलण्यासाठी सिद्ध झाले आहेत. बाहेरचे जग ना प्रेमळ आहे, ना आध्यात्मिक अनुचरण व संतुलित जीवन जगण्यास प्रोत्साहित करणारे आहे. अशा जगाच्या आव्हानांना त्यांना तोंड द्यायचे आहे. नवेकोरे स्वातंत्र्य आणि निरुपयोगी सवयी लागण्यासाठी उपलब्ध संधी यांचा मोह त्यांना पडू शकतो.

वर्षातून एकदा स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने या माजी विद्यार्थ्यांना मणपाक्कम येथे एकत्र आणण्याची गुरुदेवांची संकल्पना उत्कृष्ट अशी आहे. या योजनेकडे सर्व हितसंबंधींनी जाणीवपूर्वक आणि पद्धतशीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे. मोठ्या माणसांनी लहानांचे म्हणणे ऐकून घेण्याची आणि त्यांच्या परिस्थितीचे आकलन करण्याची ही एक नामी संधी होती. आपल्या तरूण वयातील मौज–मजा तसेच विचारांचा गोंधळ यांची स्वतःलाच आठवण करून देण्याची आणि ते या माजी विद्यार्थ्यांना सांगण्याची ही वेळ होती. त्यामुळे या माजी विद्यार्थ्यांना मोकळेपणाचा अनुभव आला, आपल्या भावना सांगाव्याशा वाटल्या, विश्वासाची अनुभूती आली आणि काळजीतून मुक्त झाल्याची, सामान्यपणाची भावनाही जाणवली. अधिक आत्मविश्वासाने आणि दृढनिश्चयासह हे युवक परतले. निरनिराळ्या विश्वविद्यालयांमध्ये होणाऱ्या विद्यार्थी उपक्रमांच्या माहितीचे आदान–प्रदान उदा. विज्ञान आणि अध्यात्म संघ, जागतिक युवा नेटवर्क– वेबिनार इ. उपयुक्त ठरले.

माझा असा विश्वास आहे की या युवकांच्या क्षमतेचा विकास करणे, त्यांना पाठबळ देणे व विचारांची स्पष्टता प्रदान करणे, या उद्दिष्टांची पूर्ती झाली आहे. हा तात्पुरता उच्च बिंदू असू शकतो, पण युवकांना सतत, जाणीवपूर्वक परस्परांच्या संपर्कात ठेवणे मग ते इंटरनेटच्या माध्यमातून का होईना, य–ासाठी या उच्च बिंदूचा उपयोग करता येईल. यामध्ये केवळ या युवकांचे मित्रच नव्हेत, तर विस्तारित समुदाय अंतर्भूत व्हावा आणि सहजमार्गातील मुख्य प्रवाहामध्ये ते एकरूप व्हावेत हा उद्देश यामागे आहे. अर्थातच, युवकांच्या उपक्रमांचे सतत परस्परांसोबत आदान–प्रदान करण्यासाठी व्यासपीठाची उपलब्धता हितकारी ठरेल.

या कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी माझ्या ध्यानात आले की ही चांगली मुले आहेत, निर्व्याज आहेत आणि गुरुदेवांविषयी त्यांना सखोल अशी आस्था आहे. काहीही झाले तरी या मुलांमुळे आपल्याला आशा करण्यास वाव आहे असे वाटून, उत्तेजित होऊन मी परतलो. स्वतःबद्दलच्या आणि समाजाविषयीच्या जबाबदारीची जाणीव जर त्यांच्या मनावर लहान वयातच ठसवली तर नवीन व सशक्त असे राष्ट्र उभारण्याच्या निकडीमध्ये भर पडेल.

वृद्ध अभ्यासींकरीता परम धाम आश्रम

गुरुदेवांनी वयोवृद्ध अभ्यासींना (६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या) आश्रमामध्ये वास्तव्य करण्यासाठी आणि आपली साधना पुढे चालू ठेवण्यासाठी 'परमधाम' हे ठिकाण निर्माण केले आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी उत्सुक असणारे अभ्यासी २ ते ६ महिने या कालावधीकरीता आश्रमामध्ये राहण्यासाठी अर्ज करू शकतात. त्यांना पर्याप्त निवास व्यवस्था, जेवण आणि इतर आवश्यक सुविधा पुरवण्यात येतील. निवास व्यवस्था उपलब्ध असेल त्याप्रमाणे अभ्यासींना त्यांच्या राहण्याचे वेळापत्रक कळविण्यात येईल. पुढील लिंकवर परमधाम आश्रमाची माहिती आणि पत्ता, तेथे उपलब्ध असलेल्या सुविधा, तसेच तेथे राहण्यासाठी करण्याचा अर्जाचा नमुना मिळेल http://www.sahajmarg.org/smww/param-dham. संपूर्ण भरलेला अर्ज paramdham@srcm.org वर पाठवावा.

भविष्यासाठी मिशनचा इतिहास आणि साधनांच्या निर्मितीमधील अभ्यासींचा सहभाग

आतापर्यंत आपल्या अभिलेखागारा(दफ्तरखाना)मध्ये कागदपत्रे, छायाचित्रे आणि दृकश्राव्य फीती इत्यादींचा सुरक्षित संग्रह करण्याकडे लक्ष दिले गेले होते. आता याला आपण ऐतिहासिक रुप देण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणजे जेव्हा कोणी १०० वर्षांनंतर मिशनच्या आणि मिशनच्या संलग्न संस्थांच्या इतिहासाविषयी संशोधन करतील तेव्हा या नोंदी आणि इतर प्रसार माध्यमे एका इतिहासकाराची भूमिका बजावतील. आज या गोष्टी आपल्याला गौण आणि नित्याच्या वाटत असतील तरी काही दशकांनंतर संशोधकासाठी माहितीचा खजिना असतील.

त्यासाठी जुन्या नोंदी (साहित्य)जमा करणे आणि विद्यमान साहित्य जतन करणे महत्त्वाचे आहे. आम्ही इतिहास विषयाची पार्श्वभूमी असलेल्या, ग्रंथपालन शास्त्र किंवा अभिलेखागार या विषयात अनुभव असणाऱ्या तसेच संगणकामध्ये कुशल अशा अभ्यासींना स्वयंसेवक म्हणून अभिलेखागार उभारण्यासाठी मणपाक्कम आश्रमामध्ये आमंत्रित केलेले आहे. पात्र आणि अनुभवी अभ्यासींना पूर्ण वेळ नोकरी देण्यात येईल.

प्रारंभ

केंद्रांमधून, विभागांमधून, देशामधून शेकडो स्वयंसेवक इतिहास अभिलेखागारासाठीचे प्राथमिक साहित्य जमा करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. जुन्या (दीर्घ काळापासून अभ्यासी असलेल्या) अभ्यासींची मुलाखत घेऊन मिशनच्या निर्मितीपासून मिशनचा विकास आणि उत्क्रांती तसेच 'तत्कालीन गुरुदेवांचे कार्य' यावर त्यांचे विचार व आठवणींची नोंद घेण्यात येत आहे. भारतातील विभागीय इतिहास समन्वयक आणि जगभरातील समन्वयकांचा एक उत्साही गट बनला आहे. नियमित प्रसिद्ध होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आणि नियमांमुळे स्वयंसेवकांना या कामाची अंमलबजावणी करण्यात मदत होते आहे. मिशनचा होत असलेला विकास आणि अभिलेखागारातील फाईल्समध्ये होणारा नित्यनवीन माहितीचा समावेश आणि नोंदी, छायाचित्रे आणि वस्तूंच्या योगदानामुळे हे काम अर्थातच न संपणारे आहे.

ज्या अभ्यासींना मिशनच्या इतिहासाच्या या "बृहत पातळी"वर होणाऱ्या संशोधन कार्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी कार्यालयामध्ये संपर्क साधावा. या प्रयत्नाचे भविष्य उज्ज्वल दिसते आहे पण अभ्यासींमध्ये 'भविष्यामधील इतिहासाची संसाधने' वर्तमानात जतन करुन ठेवण्याचा उत्साह कायम राहिला पाहिजे. दि. ५ जून २०१३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये जेव्हा या अभियानाचे संक्षिप्त वर्णन गुरुदेवांना सांगण्यात आले तेव्हा, "आपण आपला 'भविष्यातील इतिहास' वर्तमानात घडवत आहोत" अशी टीप्पणी गुरुदेवांनी केली.

नेत्याचा मार्ग अनुसरा

'जगभरात हा कार्यक्रम चालविण्यात प्रत्यक्ष गुरुदेवांनी रुचि घेतली आहे' हे यावरुन दिसते. खरे पाहता आपले गुरुदेवच मिशनमधील एकमेव आहेत ज्यांनी भावी पिढीसाठी सर्व नोंदी ठेवल्या आहेत मग त्या त्यांच्या गुरुदेवांचे जीवन, शिकवण, प्रवास असो किंवा गुरुदेवांची स्वत:ची आध्यात्मिक उन्नती तसेच व्यक्तीगत जीवन असो. एखाद्या इतिहासकाराप्रमाणे त्यांनी त्यांची दैनंदिनी व परस्परांना लिहिलेली पत्रे इतिहासाची साधने म्हणून जतन करून ठेवली आहेत. जर प्रत्येक अभ्यासीने मिशनच्या इतिहासाचा भाग बनत काय निरीक्षण केले याची नोंद ठेवली तर आपण कल्पना करू शकतो की आपल्याला माहितीचा किती मोठा खजिना खुला होईल कारण ती(माहिती) वर्तमानातच उलगडते.

तुम्ही मदत कशी करू शकता

१. जर तुम्हाला स्वयंसेवक व्हायचे असेल तर तुमच्या विभाग प्रमुखाशी संपर्क साधावा. ते तुमचा इतिहास समन्वयकासमवेत संपर्क साधून देतील.

२. ऐतिहासिक महत्व असलेल्या सामुग्रीचे योगदान करणारे कोणी तुम्हाला माहीत असेल तर तुमच्या विभागाच्या इतिहास समन्वयकास सूचित करावे.

अधिक माहितीसाठी mission.history@srcm.org येथे संपर्क साधावा.

मुलांसाठी उन्हाळी शिबिरे

द वंडरफुल टेन, इंदौर ,मध्यप्रदेश

इंदौर केंद्रामध्ये, सुमारे ४० मुलांसाठी "द वंडरफुल टेन" या पुस्तकावर आधारीत सहा दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या पुस्तकामध्ये योग्यरितीने जीवन जगण्यासाठी ईश्वराचे स्मरण करणे, उपलब्ध साधनांचा योग्य वापर, सर्वांबरोबर बंधुभाव, प्रेम आणि आत्मीयतेने राहणे ही सर्व शिकवण कथेच्या रुपात मिळते. या पुस्तकाचा उपयोग मुलांना दहा सुक्ते शिकवण्यासाठी झाला.

कार्यक्रमाची सुरुवात 'पूज्य बाबूजी महाराज मुलांना योग्य प्रकारे जीवन जगायला शिकवतात' या नाटकाच्या सादरीकरणाने झाली. प्रत्येक दिवसाच्या कार्यक्रमात सहजमार्गाच्या दोन सूक्तांचा समावेश करण्यात आला होता. अनेक स्वयंसेवकांनी पुस्तकामधील मूल्ये मुलांना समजावीत यासाठी संकल्पना आखणे, विविध खेळ आणि नाटकांची निर्मिती करणे यामध्ये भाग घेतला. मुलांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला आणि त्यांच्या मनावर याचा चांगला परिणाम झाल्याचे जाणवले.

विशाखापट्टणम

दि. १९ ते २१ मे दरम्यान आश्रमामध्ये वय वर्षे ७ ते १७ वयोगटातील सुमारे १०० मुलांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला प्रथम प्रार्थना आणि नंतर परस्पर-परिचयाने सुरुवात झाली. मुलांना ४ समूहांमध्ये विभागण्यात आले. 'ध्यानाचे फायदे', 'चारित्र्याची जडण-घडण' या विषयांवर सत्रे आयोजित करण्यात आली होती. नेतृत्व गुण आणि 'एकत्र काम करण्याची वृत्ती' (सांघिक कार्य) वाढीस लागावी, 'आपल्या गुरुंच्या बालपणाचे रेखाटन' इत्यादी विषयांवर सादरीकरण झाले. ॲनिमेटेड चित्रपट, वाद-विवाद सत्र, चिकणमातीपासून वस्तू बनवणे, प्रश्नमंजुषा, मैदानी खेळ इ. आयोजित केले होते. आश्रमाचा परिसर युवा स्वयंसेवकांनी स्वच्छ केला. रात्री ९ ची वैश्विक प्रार्थना, दैनंदिनी (रोजनिशी) लेखन, झोपण्यापूर्वीची प्रार्थना इत्यादींचे महत्त्व मुलांना स्पष्ट करुन सांगण्यात आले.

शारीरिक कसरत आणि सूर्योदय बघणे हा सकाळचा नित्यक्रम होता. लहानग्यांना स्वयंशिस्त, सत्य बोलण्यासाठी धैर्य, स्नेहपूर्ण वृत्ती, संयम इत्यादी मूल्यांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सर्व सहभागींना व स्वयंसेवकांना प्रमुख अतिथींद्वारे बक्षिस वितरणानंतर कार्यक्रमाचा शेवट झाला. काही पालकांनी मिशनमध्ये सहभागी होण्यात स्वारस्य दाखवले आणि काही सहभागी सुद्धा झाले. उन्हाळी शिबिरामध्ये सहभागी झाल्याचा आनंद आणि उत्साह मुलांनी व्यक्त केला.

मुलांचा कार्यक्रम, जळगाव, महाराष्ट्र

दि. ९ जून २०१३ रोजी जळगाव केंद्राने जळगाव आणि जवळच्या केंद्रांमधील सुमारे २६ मुलांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर मुलांना बागेमध्ये मैदानी खेळ खेळण्यासाठी नेण्यात आले. नाश्त्यानंतर कथाकथनाचे सत्र झाले आणि छोटे सादरीकरण झाले. दुपारच्या जेवणानंतर मुले रंगीत कागदापासून विविध प्रकारची नक्षी बनविण्याची कला शिकली. 'दूरचित्रवाणीचे काय करावे?' याविषयावर महत्त्वाची चर्चा झाली. बक्षिस वितरणानंतर कार्यक्रमाचा शेवट झाला. मुलांनी कार्यक्रमामध्ये उत्साहाने भाग घेतला.

जळगाव आणि जवळच्या केंद्रांतील सुमारे ३० अभ्यासींसाठी पूर्ण दिवसीय कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमादरम्यान विविध विषयांवर अनौपचारीक चर्चा झाली. दि.२४ जुलै चा समारंभ वरणगाव केंद्रामध्ये आयाजित करण्याचे ठरले. ५ वा. च्या सत्संगाने पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचा समारोप झाला.

सितापूर, उत्तर प्रदेश

विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिकतेविषयी आवड निर्माण व्हावी या एकमेव उद्देशाने दि. २१ ते ३० मे या कालावधीत सितापूर केंद्राने ब्रिज किशोर टंडन मिंटो देवी कन्या प्रशालेतील ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. प्रशिक्षण सहाय्यकांनी जन्म, 'मी कोण आहे?', शरीर, मन, बुद्धि, प्रेम, निसर्ग, प्रार्थना, गुरु, निर्माता, इत्यादि विषयांचा प्रशिक्षणात समावेश केला होता. सामाजिक हित व चालू घडामोडी या विषयांवरही संबंधित विषयातील तज्ज्ञांबरोबर तपशीलवार चर्चा करण्यात आली.

दि.२४ मे रोजी सितापूरचे एस.एस.पी. श्री. बी. बी. सिंग यांच्या 'पोलिस कार्यान्वयन पद्धति' या विषयावरील तर एन.सी.सी. चे कर्नल पी. एस. बिंद्रा यांच्या 'आपले वातावरण व प्रदूषण' या विषयावरील व्याख्यानांमुळे मुले प्रभावित झाली. सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरण केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

अहमदाबाद आश्रम

दि. ३१ मे ते २ जून दरम्यान गुजराथ मधील दोन्ही विभागातील मुलांसाठी भरविण्यात आलेल्या एका तीन दिवसीय शिबिरात ७ ते १७ वर्षे वयाच्या सुमारे ७५ मुलांनी सहभाग घेतला. सहजमार्गाच्या १० सूक्तांमध्ये नमूद केलेली सकारात्मक जीवन मूल्ये मुलांच्या मनावर बिंबविण्यावर शिबिरात जोर देण्यात आला होता. गाणी, विविध कला, हस्त व्यवसाय, पर्यावरण जतन, मैदानी खेळ व क्रीडा, प्रश्नमंजुषा, जीवनावश्यक कौशल्ये, इत्यादि शिक्षणाचा उपक्रमात समावेश होता. लघुकथा व सहजमार्गाच्या १० सूक्तांवर आधारित लघुनाटिका सादर करण्यात आल्या. ईश्वराने जन्म दिलेल्या मानवी आत्म्याच्या उत्क्रांतीवर आधारीत एक नाटिका ही शिबिरातील स्वयंसेवकांनी सादर केली. ती सर्वांना खूपच आवडली.

विविध कार्यक्रम व गट यांची व्यवस्था करण्यात १५ स्वयंसेवक सतत व्यग्र होते. गटातील सदस्यांनी अनुशासन, वेळेचे नियोजन, स्वच्छता व अपव्यय टाळणे इ. गोष्टींवर देखरेख ठेवली. शहरातील ऐतिहासिक वारसा स्थानांची सफर हा सर्वात उत्कंठावर्धक भाग होता. त्यामुळे मुलांना ६०० वर्षे पुरातन अहमदाबाद शहराच्या इतिहासाची ओळख झाली. मुलांनी एक सोपा प्रतिक्रिया प्रारूप भरून दिला. त्यावरून असे दिसून आले की बहुतेक सर्वांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला व सर्वच उपक्रमातून त्यांना खूप काही शिकावयास मिळाले.

पनवेल आश्रम, मुंबई

८ ते १२ व १३ ते १७ अशा दोन्ही वयोगटातील प्रत्येकी सुमारे ४५ मुले दि. १७ मे ते १९ मे दरम्यान पनवेल आश्रमातील तीन दिवसांच्या शिबिरात उपस्थित होती. पुणे, नाशिक, खोपोली या सारख्या जवळपासच्या केंद्रांतून ती आली होती. दि. १७ मे रोजी अनोळखीपणाचे अडसर दूर करणाऱ्या एका सत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर 'मौज' या शब्दाचा अर्थ, वितरणाच्या दैवी व मानवी पद्धति, मी कोण आहे? आदि विषयांवर सामूहिक उपक्रम झाले. बालक व किशोर वर्गाने दिलेला प्रतिसाद व नोंदविलेली निरीक्षणे पाहून प्रशिक्षण सहाय्यक भारावून गेले. संध्याकाळचे सत्र 'द्वेष, मत्सर व पूर्वग्रह इ. भावनांचा त्याग करणे व त्या ऐवजी प्रेम ही भावना जागृत करणे' या विषयावर होते. रात्री झोपायला जाण्यापूर्वी किशोरवयीन मुलांना रोजनिशी लिहिण्यास सांगण्यात आले.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी लवकर योग साधनेने झाली. पुढील सत्र किशोरवयीन मुलांसाठी 'पैशांचे महत्व' या विषयावर होते तर बालकांसाठी सहजमार्गाची दहा सूक्ते एका अभिनव व प्रभावी पद्धतीने संख्यांशी निगडित करण्यात आली होती. नंतर मुलांना प्रेरणादायी लघुचित्रफिती दाखविण्यात आल्या व त्यानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. 'यशाचा मार्ग स्थापित करणे' या विषयावरील कार्यक्रमामुळे आपल्या भावी व्यवसाय/ पेशा संबंधी वक्त्यांना प्रश्न विचारण्याची संधी मुलांना प्राप्त झाली. बंधू सुदेश त्रिपाठी यांनी 'अमूल्य भारत' व 'आकस्मिकपणे लागलेले दहा वैज्ञानिक शोध' ह्या चित्रफिती दाखविल्या. दृष्टिभ्रम व मेंदूला खुराक असलेली एक मनोवेधक प्रश्नमंजुषा स्पर्धा त्यानंतर घेण्यात आली.

शेवटच्या दिवशी मुलांना मैदानी खेळांसाठी जवळच्याच एका बागेत नेण्यात आले. गुरुदेवांनी सांगितलेल्या गोष्टींवर बसविलेल्या नाटिका मुलांनी सादर केल्या. त्यासाठी ते गेल्या दोन रात्री सराव करीत होते. पारितोषिक वितरणाने शिबिराची सांगता झाली. मुलांनी नोंदविलेल्या प्रतिक्रियांवरून मुलांनी शिबिराचा आनंद लुटल्याचे निदर्शनास येत होते.

नविन नेमणूका

बंधू के.टी. कृष्णन
केंद्रप्रमुख, पलक्कड

बंधू सी.के. प्रमोद
केन्द्रप्रमुख, कोची/एर्नाकुलम

बंधू पी.के. गोपिनाथ
केन्द्रप्रमुख, पट्टाम्बी

क्षेत्रीय युवा चर्चासत्र, भोपाळ, मध्यप्रदेश

दि. ११ व १२ मे रोजी भोपाळ आश्रम येथे १८ ते ३५ या वयोगटातील युवा अभ्यासींसाठी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसांच्या क्षेत्रीय युवा चर्चासत्रास विदिशा, भोपाळ, गंज बसोदा, होशंगाबाद, जबलपूर, टिकमगढ, बेरासिया, दिल्लोड, रेवा इत्यादि केंद्रांतून आलेले ४३ अभ्यासी अत्यंत उत्साहाने उपस्थित होते.

'सहजमार्ग व जीवनाचे एकात्मीकरण' हा या चर्चासत्राचा विषय होता. दि. ११ रोजी नोंदणीकरणानंतर' जीवनातील संतुलन' या विषयाने कार्यक्रम सुरु झाला. दि. १२ रोजी 'एकत्र काम करणे' हा विषय केंद्रस्थानी होता. उपक्रम, भाषणे, गुरुदेवांच्या चित्रफिती, आत्मपरीक्षण व कार्यान्वयन सत्र, छोट्या गटात समूहचर्चा, सर्कल टाइम, केस स्टडी, नाटिका, खेळ इत्यादी विविधांगी उपक्रमातून या दोन्ही विषयांचा उहापोह करण्यात आला. युवा अभ्यासींनी सर्व कार्यक्रमात मनापासून भाग घेऊन गुरुदेवांनी निर्माण केलेल्या दिव्य वातावरणाचा आनंद लुटला. गुरुदेवांशी अनुसंधान हीच 'जीवनातील संतुलन' व 'एकत्र काम करण्याची' गुरुकिल्ली आहे हे अभ्यासींना पूर्णपणे उमगले. सर्व सहभागी अतिशय आनंदात होते व अशाच प्रकारचा आणखी एखादा कार्यक्रम लवकरच घेण्यात यावा असे मत त्यांनी व्यक्त केले.

रजत जयंती समारंभ, विशाखापट्टणम

दि. १५ मे १९८८ रोजी गुरुदेवांनी या आश्रमाचे उद्घाटन केले होते. केंद्रातील अभ्यासींनी २५ व्या वर्षाचा हा प्रसंग साजरा करण्याचे ठरविले. गुरुदेवांनी हा प्रस्ताव स्विकारुन समारंभ सहजमार्गाला साजेशा पद्धतीने साजरा करण्याविषयी सूचना दिल्या. जवळपासच्या १२ उपकेंद्रांतील ६०० हून अधिक अभ्यासी समारंभास उपस्थित होते. दि.१५ मे रोजी सकाळी ९ वाजता १९८८ साली केंद्रप्रमुख असलेल्या विश्वपति शास्त्री यांनी संचालित केलेल्या सत्संगाने समारंभाची सुरुवात झाली. १९८८ पासून साधना करत असलेले अभ्यासी तसेच पदाधिकारी व स्वयंसेवकांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

ज्या अभ्यासींनी १९८८ मध्ये मिशनमध्ये प्रवेश केला होता व नंतर ज्यांच्या मिशनमध्ये नियमित येण्यात खंड पडला होता अशा अभ्यासींना केंद्रप्रमुख बंधू सप्तमुखुलु यांनी समारंभाचे विशेष आमंत्रण दिले होते. त्यातील जवळजवळ पन्नास जण समारंभास उपस्थित होते व त्यांनी आश्रमात बराच वेळ व्यतित केला. काही जणांनी तर साधना पुन्हा सुरु करण्यातही स्वारस्य दाखविले.

१९८८ मध्ये आश्रमाच्या उद्घाटनाच्या वेळी गुरुदेवांनी 'गुरुदेवांशी नातेसबंध', 'आश्रमांचे प्रयोजन', 'साधनेची आत्यंतिक निकड' इत्यादि विषयावर काही भाषणे दिली होती. भाषणांसाठी आताही तेच विषय निवडण्यात आले होते.

संध्याकाळी साडे सहा वाजता सत्संगाने समारंभाची सांगता झाली. स्थानिक तेलगू वृत्तपत्रांमध्ये या समारंभास प्रसिद्धी देण्यात आली. खरोखरच सर्व अभ्यासींसाठी तो एक संस्मरणीय दिवस होता. सर्वजण त्यांना झालेला आनंद व गुरुदेवांच्या कृपेने ओतप्रोत भरलेल्या या समारंभाप्रति कृतज्ञता व्यक्त करत होते.

देवरिया आश्रम, उत्तर प्रदेश

प्रकाशाचे केंद्र

देवरिया हे जिल्ह्याचे मुख्यालय असून उत्तर प्रदेशाच्या दूरगामी पूर्व भागात वसलेले आहे. गोरखपूर पासून ते सुमारे ५० कि.मी. अंतरावर आहे. मंदिरांचे गाव असा 'देवरिया'या शब्दाचा अर्थ आहे. देवरिया केंद्र १९९४ मध्ये अस्तित्वात आले. बिहारच्या चपारा येथील प्रशिक्षक बंधू रामदास सिंह यांचा हे केंद्र उभारण्यात प्रमुख सहभाग होता. त्यांच्या सततच्या भेटींमुळे कालांतराने या केंद्रासाठी देवरिया येथील बंधू अजय तिवारी यांना पहिले प्रशिक्षक बन–विण्यात आले. बंधू तिवारी यांच्या अथक परिश्रमाने या केंद्राच्या अभ्यासींची संख्या अनेक पटीने वाढली. समाजाच्या प्रत्येक स्तरामधील व्यक्ती मिशनमध्ये सामील झाल्या. सध्या प्रशिक्षक असलेले गुरुदेवांचे बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे सहपाठी बंधू रामशंकर दिक्षित हे त्यांमधील एक होत. गुरुदेवांनी दि. १५ आक्टोबर १९९९ रोजी देवरिया येथे काही तासांकरिता एक धावती भेट दिली होती. ही भेट जरी छोटीशी असली तरी देवरियाच्या अभ्यासींसाठी ती एक पवित्र अशी घटना होती.

बंधू दिक्षित यांच्या निवासस्थानी नियमितपणे सत्संग होत असे. अभ्यासींच्या संख्येत होत असलेल्या वृद्धीमुळे आश्रमाची गरज सर्वांनाच भासू लागली. वैद्य पारसनाथ तिवारी, डॉ. मूर्जानी व बंधू आय. डी. केडिया यांच्यासह इतर समर्पित अभ्यासींच्या एका गटाने दि. २१ जून २००१ रोजी आश्रमाची जमीन विकत घेण्यास मदत केली.

जागेचे एकूण क्षेत्रफळ १.५ एकर असून ती देवरिया शहरापासून सुमारे चार कि.मी. अंतरावरील सोनूघाट येथे आहे. दि. १९ मार्च २००६ रोजी आश्रमाच्या बांधकामाला सुरुवात झाली. ध्यानकक्ष व स्वयंपाकघराचे क्षेत्रफळ हे ६५ गुणीले ४० फूट एवढे आहे. यामध्ये सुमारे १०० अभ्यासी ध्यानाला बसू शकतात. दि. १६ नोव्हेंबर २००८ रोजी मिशनचे सचिव बंधू उमाशंकर वाजपेयी यांच्या हस्ते गुरुदेवांच्या निर्देशनानुसार आश्रमाचे उद्घाटन झाले. गुरुदेवांनी प्रेमाने या आश्रमाला 'शांती आश्रम' असे नाव दिले.

आश्रमामध्ये स्वछतागृह, कार्यवाहाची खोली अशा सोयी असून आश्रमाच्या निर्मळ सुंदरतेमध्ये भर घालणारी एक छोटी बागही आहे. अभ्यासींच्या रात्रीच्या निवासासाठी हा आश्रम सुसज्ज आहे. रविवारच्या सत्संगासाठी सुमारे ८० अभ्यासी नियमितपणे एकत्र येतात. जवळपासच्या केंद्रांमधील अभ्यासींसमवेत येथे भंडारा उत्सव साजरे केले जातात. येथील स्थानिक अभ्यासी रविवारच्या सत्संगाव्यतिरिक्त अभ्यासी प्रशिक्षण व निबंध लेखन स्पर्धा यासारखे महत्वपूर्ण कार्यक्रमही आयोजित करतात. आश्रमाचे फाटक उभारणे व आश्रमाच्या परिसरात सौरविद्युतीकरण यासारख्या भविष्यातील योजना आश्रम व्यवस्थापन गटाच्या आहेत.

गुरुदेवांनी आमच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रेमभराने देऊ केलेल्या या आश्रमामुळे आम्ही धन्य झालो आहोत.



To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.